अर्थ
अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.
प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
*वर्गणीचे दर :*
वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.
किरकोळ अंक : ४ आ.
*जाहिरातीचे दर :*
कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः—
" अर्थ "
" *दुर्गाधिवास* " पुणें ४.



REGISTERED No. B. 3434


# अर्थ


वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ३१ आगस्ट, १९४९ अंक ३५



## सारस्वत
### को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[ स्थापना १९१८ ]



सारस्वत बँक बिल्डिंग, मुंबई ४ टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ४,२५,००० |
| रिझर्व्ह | ... | रु. २,६५,००० |
| ठेवी | ... | रु. ८८,५२,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ९६,५२,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

सब–ऑफिस :
—दादर—
( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

वा. पुं. वर्दे,
बी. कॉम्.,
अध्यक्ष.
शं. वि. संझगिरी,
बी. कॉम्.,
सेक्रेटरी.

बेळगांव शाखा : मार्केट, बेळगांव



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,३०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २ कोटींचे वर |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. धों. कृ. साठे ( चेअरमन ), श्री. श्री. गो. मराठे ( व्हाइस चेअरमन ),
श्री. न. ग. पवार, श्री. फ. दो. पदमजी,
श्री. मा. रा. जोशी, श्री. शं. ल. किर्लोस्कर,
श्री. मा. वि. शहा, श्री. मो. रा. ढमढेरे.
श्री. भा. म. गुप्ते,

★ चालू खात्यावर द. सा. द. शे. अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
★ सेव्हिंग्ज खात्यावर द. सा. द. शे. १॥ टक्का व्याज मिळतें.
★ मुदती ठेवींची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते.
★ सोलापूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था केली आहे.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २
सी. व्ही. जोग, मॅनेजर.
( पॅरेमाउंट लि. )



## दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.
हेड ऑफिसः—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा
शाखाः—औंध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.
मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे
★ ठिकाणांवर ड्राफ्ट्स् दिले जातात.

बचतीच्या आकर्षक योजना

★ मुदत ठेवी आकर्षक दरानें १ ते ५ वर्षे पर्यंत स्वीकारल्या जातात.
★ सेव्हिंग बँकेंत रु. १५,०००/– पर्यंत ठेव ठेवतां येते. खात्यांतून आठवड्यांतून दोनदा चेकनें रकमा काढतां येतात. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा.
वा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.



—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था
## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २
*—आमचीं वैशिष्टयें—*

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.
—मॅनेजिंग डायरेक्टर

## सोसायट्यांस विनंति

किर्लोस्कर कंपनी सोसायट्यांना ज्या भावांत माल देते त्याच भावांत आम्हींहि नांगर वगैरे माल पुरवितों. आपली कोणतीहि ऑर्डर आपण आमचे मार्फत पाठविण्यानें तोटा नसून फायदाच आहे. सर्व तऱ्हेची सोसायट्यांना लागणारी माहिती व इतरहि माल आम्ही पुरवितों.

या वर्षाची ऑर्डर आमचे मार्फतच पाठवा.

केळकर बंधु, पुणें व नाशिक.


## विविध माहिती

**जर्मन शास्त्रज्ञ बंगलोरला रुजू**—बंगलोर येथील संशोधन संस्थेंत प्रो. एच्. मुलर हे जर्मन शास्त्रज्ञ नुकतेच रूज झाले. हाय टेन्शन इंजिनिअरिंग ह्या विषयाचे ते तज्ज्ञ आहेत. प्रो. मुलर हे हिंदुस्थान सरकारच्या आमंत्रणावरून हिंदुस्थानांत आले आहेत. हिंदुस्थानांतील लोकांचें राहणीचें मान वाढवावयाचें असल्यास मोठे उद्योगधंदे आणि त्यांना लागणारी प्रेरक शक्ति ह्यांची फार आवश्यता आहे, त्यासाठीं उच्च दर्जाच्या संशोधनसंस्था असल्याशिवाय चांगले उद्योगधंदे चालणार नाहींत, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. मि. मुलर ह्यांचें वय ५४ वर्षांचें असून उत्तर जर्मनींतील एका मोठ्या तांत्रिक विद्यापीठांत ते प्राध्यापकाचें काम करीत होते.

**बिगर परवाना रेडिओविरुद्ध मोहिम**—कलकत्ता आणि त्या शहराचीं उपनगरें ह्यामधून बिगर परवाना रेडिओ वापरणारे लोक हुडकून काढण्याची मोहिम ता. २३ ऑगस्ट पासून सुरू करण्यांत आली आहे.

**हैदराबाद संस्थानांत आर्थिक पहाणी**—हैदराबाद संस्थानांतील १०० खेड्यांची आर्थिक पहाणी करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ८ प्रमुख अर्थशास्त्रज्ञांची नेमणूक करण्यांत आली असून त्यांच्या दिमतीस एक आंकडेशास्त्रज्ञही देण्यांत येणार आहे. ग्रामीण भागांतील जनतेच्या आर्थिक जीवनाची माहिती मिळविण्याचा ह्या पहाणीचा उद्देश आहे.

**तागाच्या निर्यातीचे परवाने**—मलाया आणि सिंगापूर येथील कंपन्यांकडे तागाचा माल निर्यात करण्याचे परवाने हिंदी कंपन्यांना देण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. मात्र मलायांतील कंपन्यांनीं हा माल आपण दक्षिण अफ्रिकेला पुन्हां निर्यात करणार नाहीं अशी हमी मलायाच्या सरकार मार्फत द्यावयाची आहे. इतर ठिकाणीं त्यांनीं माल निर्यात करण्याला अर्थातच कांहीं बंधन घालण्यांत येणार नाहीं.

**अमेरिकेच्या शस्त्रास्त्रांच्या मदतीचे परिणाम**—अमेरिकन अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठीं उभे राहिलेले प्रोग्रेसिव्ह पक्षाचे उमेदवार मि. हेन्री वालेस ह्यांनीं, प्रे. ट्रूमन ह्यांनीं पुरस्कारलेल्या युरोपला शस्त्रास्त्रें देण्याच्या कार्यक्रमास विरोध प्रदर्शित केला आहे. त्यांच्या मतानें ह्या कार्यक्रमामुळें अमेरिका आणि युरोप ह्या दोघांचेंही आर्थिक स्थैर्य आणि लष्करी शाश्वति ढांसळल्याशिवाय राहणार नाहीं.

**मुंबई प्रांतांतील खेड्यांची पिण्याच्या पाण्याची सोय**—मुंबई सरकारनें १९४६ सालीं खेड्यांतील पाणी पुरवठा सुधारण्यासाठीं ५ वर्षांची एक योजना हातीं घेतली होती. ह्या योजनेप्रमाणें ८,२०० खेड्यांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यांत यावयाची आहे. आतापर्यंत वरील योजनेनुसार १,००० खेड्यांना पिण्याचें पाणी मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**आग्रा येथें निसर्गोपचार केंद्र**—आग्रा येथील गांधी आश्रमांत निसर्गोपचारानें रोग बरे करण्याचें एक केंद्र उघडण्यांत येणार आहे. ह्या केंद्रांत गरिबांना मोफत उपचार करण्यांत येणार आहे. आग्रा येथील आश्रमांत महात्मा गांधी १९२० सालीं राहिले होते.

**बिहार प्रांतांत क्षयरोग विरोधी मोहिम**—बिहार प्रांतांत येत्या ऑक्टोबरपासून बी. जी. जी. नांवाचें, क्षयरोग निवारक औषध टोंचण्याचें काम हातीं घेण्यांत येणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या क्षयरोग कमिटीनें पाटण्यामधील डॉक्टर मंडळींशीं ह्या योजनेबद्दल विचारविनिमय केला आणि औषधाची कार्यक्षमता त्यांना समजाऊन सांगितली.

**मद्रास शहरांत यांत्रिक नांगराचा कारखाना**—मद्रास प्रांताच्या उद्योगमंत्र्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, मद्रास शहरांत यांत्रिक नांगरांचा कारखाना उभारण्याची परवानगी एका कंपनीला देण्यांत आली आहे. ही कंपनी एका ब्रिटिश कंपनीच्या सहकार्यानें वरील कारखाना काढणार आहे. भांडवलांतही ब्रिटिश कंपनीला भागीदारी देण्यांत येणार आहे. मद्रास शहरांत सायकलींचे दोन कारखानेही निघणार आहेत. ह्या दोन कारखान्यांपैकीं एक म्हैसूरला काढण्याचें प्रथम ठरलें होतें. परंतु म्हैसूर सरकारनें पैशाच्या अभावीं कारखाना काढण्याचें रद्द केलें. दोन्ही कारखान्यांतून मिळून दरवर्षी ३०,००० सायकली तयार होतील असा अंदाज आहे. कारखान्याचें भांडवल अंशतः हिंदी व ब्रिटिश कंपन्या आणि अंशतः प्रांतिक व मध्यवर्ती सरकार उभारणार आहेत.

**काश्मीरसाठीं मीठ**—सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रॅन्सपोर्टच्या स्टँडिंग कमिटीनें काश्मीरकडे १,६७,६२५ मण मीठ वाहून नेण्याची खास व्यवस्था केली आहे. हिंदुस्थानांत खनिज मीठ मुख्यतः खाराघोडा आणि सांबर ह्या ठिकाणीं सांपडतें. ह्या दोन्ही ठिकाणांहून मिठाची वाहतूक करण्यासाठीं ५-५ खास गाड्या सोडण्यांत येणार आहेत. पहिली खास गाडी सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत निघणार आहे.

**इंग्लंडला अधिक कर्ज देऊं नका?**—पुढील महिन्यांत वॉशिंग्टन येथें डॉलर्सच्या टंचाईबाबत वाटाघाटी सुरू होणार आहेत. त्यावेळीं कॅनडाचे प्रतिनिधी अशी भूमिका घेणार आहेत कीं ब्रिटनला आतां अधिक कर्ज देऊं नये. त्याचप्रमाणें ब्रिटननें आपलें उत्पादन वाढविण्यासाठीं ताबडतोब उपाययोजना करावी आणि परदेशांशीं स्वतंत्र करार करण्याचें धोरण बंद करावें, अशीहि मागणी कॅनडाचे प्रतिनिधी करणार असल्याची वार्ता आहे.


बेडेकर पापड वापरा.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

# अर्थ

बुधवार, ता. ३१ आगस्ट १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## कापड गिरण्यांची यंत्रसामुग्री तयार करण्याचा धंदा

कापडाचा धंदा हा हिंदमध्यें सर्वांत जुना व सर्वांत मोठा धंदा आहे. गेल्या ९० वर्षांत ह्या धंद्याची वाढ झाली ती बरीचशी एकतर्फी झाली. कारण, सूत विणणें व कापड विणणें ह्या गोष्टीं-वरच भर दिला गेला, परंतु ह्या धंद्याला लागणाऱ्या यंत्रसामुग्रीबद्दल विचार कांहींच करण्यांत आला नाहीं. याला कारण पारतंत्र्याच्या काळांतील एकंदर परिस्थिति हेंहि कांहींसें असावें. दुसऱ्या महायुद्धांत नवीन यंत्रसामुग्री मिळण्याच्या अशक्यतेमुळें कापड गिरण्यांना लागणारी यंत्रसामुग्री येथेंच तयार केली जावी या दृष्टीनें प्रयत्न होऊं लागले. परंतु अद्याप हे प्रयत्न प्राथमिक अवस्थेंतच आहेत. कापड गिरण्यांतील बहुतेक यंत्रसामुग्री अगदी जीर्ण झाली आहे व ती बदलणें अगदी आवश्यक आहे. १९४७ सालीं टॅरिफ बोर्डानें कापड गिरण्यांना लागणारी यंत्रसामुग्री बनविण्याच्या धंद्याची संरक्षणाचे उद्देशानें चवकशी केल्यावर असा निर्णय दिला कीं, धंद्याची संरक्षणासाठीं मागणी वाजवीपेक्षां लौकर आहे. जुलै महिन्यांत टॅरिफ बोर्डानें या धंद्याची पुन्हा चवकशी केली. सूत कातण्याच्या यंत्रसामुग्रीचे बाबतींत हिंदला पूर्णपणें परदेशच्या आयातीवरच अवलंबून राहावें लागतें. रिंग-फ्रेम्सचा पुरवठा मात्र येथें होऊं शकतो. रिंगफ्रेम्स तयार करणारे सध्यां चार कारखाने आहेत. आणखी दोन कारखाने लौकरच निघण्याचा संभव आहे. मागहि येथें तयार होतात. हा धंदा हिंदमध्यें सुरू झाला आहे एवढें निश्चित. ह्या धंद्यानें केलेली सुरुवात समाधानकारक आहे असा कांहीं तज्ज्ञांचाहि अभिप्राय आहे.

कापड गिरण्यांना लागणारी यंत्रसामुग्री तयार करण्याचा धंदा हा विशेषतः स्थिर स्वरूपाच्या मागणीवर अवलंबून आहे. परंतु या बाबतींत परिस्थिति अशी आहे कीं, सध्यांची ९० टक्के यंत्र-सामुग्री साधारणपणें १९३६ च्या पूर्वीची असल्यामुळें मागणी नजीकच्या कांहीं वर्षांतच जास्त राहील, परंतु पुढें ती नक्की कमी होत जाईल. गिरण्यांची संख्या वाढली तरच मागणी कायम स्वरूपाची राहील. नवीन गिरण्या निघण्याचा संभव फारसा दिसत नाहीं. उलट, आहेत ह्याच गिरण्यांना कापसाच्या पुरवठ्याच्या अभावीं भरपूर काम नाहीं म्हणून त्या कांहीं दिवस बंद ठेवाव्या अशी आज परिस्थिति निर्माण झाली आहे. परदेशांतून जर यंत्र-सामुग्रीला मागणी आली तर स्थिर स्वरूपांत मागणी टिकूं शकेल. परंतु याहि बाबतींत कांहीं शक्यता आहे असें म्हणवत नाहीं.

सारांश, आज वास्तवतेला धरून ह्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. एका बाजूला कच्चा माल या दृष्टीनें लांब धाग्याच्या कापसाचा तुटवडा व दुसऱ्या बाजूला धंदा टिकविण्यासाठीं परदे-शच्या यंत्रसामुग्रीची आवश्यकता आहे. कापड गिरण्यांत आज सुमारें ६० कोटी रुपये भांडवल गुंतविलें गेलें आहे. तेव्हां एवढा प्रचंड व्याप असलेल्या धंद्याच्या मालकांनीं गिरण्यांना लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचे कारखाने जरूरीप्रमाणें वाढवावे, कारण त्याच यंत्रसामुग्रीच्या कारखान्यावर धंद्याचें भवितव्य अवलंबून आहे. आपले बहुतेक सर्व उद्योगधंदे यंत्रसामुग्रीसाठीं परदेशावरच अव-लंबून आहेत. तेव्हां मशिनरी तयार करण्याच्या कारखान्यावर यापुढें भर दिला पाहिजे.

## ब्रिटिश बँकांच्या खास सवलती रद्द

इराणच्या सरकारनें विनंति केल्यामुळें इंपीरिअल बँक ऑफ इराण ह्या बँकेनें आपल्या नांवांतील ‘ इंपीरिअल ’ हा शब्द काढून टाकला आहे. बँकेनें ‘ब्रिटिश बँक ऑफ इराण अँड दि मिडल ईस्ट’ असें नवीन अभिधान धारण केलें आहे. ह्या बँकेला गेलीं साठ वर्षें असलेल्या अनेक व्यापारी सवलतींचा आतां शेवट झाला आहे. एका काळीं बँकेला बँकिंगच्या व्यवसायाची मक्तेदारी होती. त्याशिवाय चलनी नोटा काढण्यावरील नियंत्रणाबाबत आणि सर्व करांची माफी अशाही सवलती होत्या; परंतु कालौघांत त्यापैकीं बहुतेक रद्द झालेल्या होत्या. इंपीरिअल बँकेला देण्यांत आलेल्या खास सवलतीमुळें स्थानिक बँका ह्या बँकेचा हेवा फार काळ करीत असत. अशा स्थानिक बँकांत १९३२ सालीं स्थापन झालेली बँक मेल्ली इराण ही एक आहे. ह्या बँकेशीं इंपीरिअल बँकेचे संबंध जरा तेढींचेच होते. सरकारी अधिकाऱ्यांच्या पाठिंब्यामुळें बँक मेल्ली हिनें इंपीरिअल बँकेशी स्पर्धा सुरू केली. आतां ही बँक व्यापारी व्यवहार तर करतेच पण तिला चलनी नोटा काढण्या-चीही मक्तेदारी मिळाली आहे. इंपीरिअल बँकेच्या सवलती रद्द झाल्या असल्यानें इराणच्या सरकारनें सर्व परकीय बँकांवर एक बंधन जारी केलें आहे. परकीय बँकांनीं आपल्या सार्वजनिक ठेवी-पैकीं निदान ५५ टक्के रक्कम बँक मेल्ली इराण ह्या संस्थेंत विना-व्याज ठेवली पाहिजे असा हुकूम काढण्यांत आला आहे. लंडन एकॉनॉमिस्ट पत्र ह्यासंबंधीं म्हणते कीं, हा हुकूम बँकांवर नियंत्रण ठेवण्याच्या स्वरूपाच्या नसून तो आक्रमक राष्ट्रीयीकरणा-पासून जन्मलेला शिक्षा देण्याचा उपाय आहे. इंपीरिअल बँकेच्या वार्षिक सभेच्या वेळीं, बँकेचे अध्यक्ष लॉर्ड केनेट ह्यांनीं असें सांगितलें कीं, वरील हुकूम पाळावयाचा झाल्यास बँकेला इराण-मधील आपलें भांडवल बरेंच वाढवावें लागेल; तथापि सहा महि-न्याची नोटीस देऊन बँकेचें सर्व भांडवल बाहेर नेऊं देण्याची हमी बँकेनें मिळविली आहे. भांडवल परत करतांना, बँकेनें भांडवल वाढवितांना जो हुंडणावळीचा दर दिला असेल तोच धरण्यांत येणार आहे.

ह्या बँकेनें इराणमधील आपले व्यवहार चालू ठेवण्याचे ठरविलें असलें, तरी गेल्या कांहीं वर्षांत तिनें आपला व्याप आवरता घेतला आहे. आता इराणमध्यें बँकेच्या शाखा कमी झाल्या आहेत. इरा-णमधील चालू शाखांची संख्या आणि मध्यपूर्वेतील इतर देशांतील बँकेच्या शाखांची संख्या जवळ जवळ सारखीच झाली आहे.

पर्शिअन आखाताच्या भागांत आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत असल्यानें बँकेच्या दृष्टीनें हा प्रदेश वाढत्या महत्त्वाचा झाला आहे. कुवाइट, बहरीन आणि दुबाई येथें बँकेच्या शाखा आहेतच. आतां मस्कत येथेंही एक शाखा उघडण्यांत आली आहे. १९४८-४९ सालांत सीरिआ आणि लेबॅनॉन देशांतील बँकेचा व्यवहार वाढला असून स्थानिक कायदेकानूमुळें हुंडणावळीचा व्यवहार परत बँकेच्यामार्फत करण्यांत येऊं लागला आहे. पूर्वी हुंडणावळीचा व्यवहार बाजारांत होत असे. असें असलें तरी, व्यापाराच्या एकंदर चढामोडीबद्दल आणि हुंडणावळीच्या नियमांबद्दल डोळ्यांत तेल घालून लक्ष देणें जरूर असते. हुंडणावळीवरील स्थानिक निर्बंधांमुळें देशादेशांतून पैशाचा बदला करणें कठीण जाते. त्यामुळें प्रत्येक विभागांत ठेवणें जरूर असलेल्या हुंडणावळीच्या निधींत बरीच वाढ झाली आहे.

## हिंदुस्थानांत समाधानकारक यंत्र निर्मिति

### किर्लोस्कर पीटर इंजिन

श्री. संपादक ' अर्थ ' यांस सा. न. वि. वि.

सोबत किर्लोस्कर पीटर इंजिन व पंपिंग सेटबद्दल आमचा अनुभव कळविला आहे. देशी धंद्यासंबंधीं माहिती व उत्तेजन देणेचें आपले पत्राचें धोरण जाणून तो प्रसिद्धीकरितां पाठविला आहे.

आम्ही आपले बारामतीचे नजीकचे मळ्यांतील विहीरीवर किर्लोस्कर पीटर इंजिन व पंप असा सेट सुमारें एक महिन्यापूर्वी बसविला आहे. पाच हॉ. पॉ. चे इंजिननें ३ इंच×२॥ इंचाचा पंप उत्तम रीतीनें चालतो. पंचवीस फूट सक्शन व बावीस फूट डिलिव्हरीपर्यंत सतत तीन मोटींचें पाणी चालतें. गांवानजीक विहीर असलेनें बारामतीस येणारे शेतकरी पंपिंग सेट प्रत्यक्ष चालू असताना पाहून खूष होतात. कांहीं जणांनीं लगेच सेट स्वतःकरिता आणले आहेत. परदेशी यंत्रांचे तोडीची यंत्रसामुग्री करणेबद्दलचे आपले कीर्तीत किर्लोस्करांनीं या पंपिंग सेटनें भर टाकली आहे.

| | |
|---|---|
| बारामती<br>१९-८-४९ | के. न. गोखले,<br>बी. ए., एलएल. बी.,<br>वकील व बागायतदार |

### सेफ डिपॉझिट व्हॉल्ट वाढीचें उद्‌घाटन

आपल्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील कप्प्यांस असलेली गिऱ्हाइकांची मागणी पुरी पाडण्यासाठी पुणें सेंट्रल को. बँकेनें आपल्या व्हॉल्टच्या तळघराची वाढ केली आहे. त्याचा उद्‌घाटन समारंभ रविवार, ता. ४ सप्टेंबर रोजीं सकाळीं ९ वाजतां पुणें म्युनिसिपल कमिशनर, श्री. बर्वे, ह्यांच्या हस्तें होणार आहे. ४ सप्टेंबर हा बँकेचा ३२ वा वाढदिवसहि आहे.

### महाराष्ट्र बँकेच्या दोन नव्या शाखा

महाराष्ट्र बँकेनें हैद्राबाद व कोल्हापूर येथें शाखा उघडण्याचें ठरविलें असून दोन्हींची पूर्वतयारी झाली आहे.

### सांताक्रूझ विमानतळाबाबत पं. नेहरूंच्या सूचना

सांताक्रूझ येथील विमानतळाची वाढ करतांना शक्य तितकी काटकसर करण्यांत यावी अशी सूचना हिंद सरकारच्या हवाई वहातूक अधिकाऱ्यांना पं. नेहरूनीं दिली आहे असें समजतें. विमानतळावर नवीन बांधण्यांत येणाऱ्या इमारतींत सौंदर्य अगर आकर्षकपणा ह्यांच्यापेक्षा उपयुक्ततेला अधिक महत्त्व देण्यांत यावें अशी पं. नेहरूंची इच्छा आहे.

## कंपनी कायद्यांत दुरुस्ती

[२]

### (४) स्टॉक एक्सचेंजवर शेअर आणण्याचा अर्ज

कंपनीच्या शेअर्सची स्टॉक एक्सचेंजवर देव-घेव होण्यास मान्यता मिळविण्यासाठी अर्ज केला जाईल, असें प्रॉस्पेक्टसमध्यें कित्येक वेळां जाहीर केलेलें असतें. शेअर्स घेणारांची त्यामुळें समजूत होते, कीं त्यांचे शेअर्स त्यांना जरूर तेव्हां विकतां येतील. परंतु त्यांची निराशा होण्याचा संभव असतो. कित्येक कंपन्या स्टॉक एक्सचेंजवर शेअर आणण्यासाठी अर्जहि करीत नाहींत आणि अर्ज करणाऱ्या कंपन्यांपैकीं बहुतेकांचे अर्ज नामंजूर होतात, कारण आवश्यक त्या अटी त्यांना पुऱ्या करतां येत नाहींत. भागीदारांचें त्यामुळें नुकसान होऊं नये, ह्यासाठी बॉंबे स्टॉक एक्सचेंजची सूचना खालीलप्रमाणें आहे:—

( अ ) शेअर स्टॉक एक्सचेंजवर आणण्यासाठी अर्ज करण्यांत येईल असें प्रॉस्पेक्टसमध्यें म्हटलें असल्यास, शेअरसाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत संपल्यावर दहा दिवसांचे आंत असा अर्ज करण्यांत आला पाहिजे; आणि ( ब ) स्टॉक एक्सचेंजनें अर्ज फेटाळून लावल्यास कंपनीनें केलेली शेअर्सची ॲलॉटमेंट रद्द समजण्यांत यावी व अर्जासोबत पाठविलेली रक्कम ज्याची त्यास परत करण्यांत यावी.

### (५) प्रॉक्झी व त्यांचा इष्ट उपयोग

कंपनीच्या ज्या सभांना प्रत्यक्ष उपस्थित होतां येत नाहीं, अशा सभांतील प्रश्नांवर मत देणें प्रॉक्झीच्या पद्धतीनें भागीदारांना शक्य होतें. कंपनीचे भागीदार सर्वत्र विखुरलेले असतात आणि त्यांपैकीं बहुतेकांना सभेस उपस्थित होणें सोईचें असत नाहीं. ह्या प्रॉक्झी पद्धतीचा पुष्कळ वेळा दुरुपयोग केलेला आढळतो. कित्येक कंपन्यांच्या आर्टिकलसमध्यें कंपनीच्या खर्चानें प्रॉक्झी गोळा करण्याचा अधिकार मॅनेजिंग एजंटांना दिलेला असतो. प्रॉक्झी गोळा करणें खर्चाचें व त्रासाचें काम असतें, परंतु मॅनेजिंग एजंट व डायरेक्टर ह्यांना तें सुलभतेनें करणें शक्य होतें. स्वतःसाठी प्रॉक्झी जमविण्यासाठी ते कंपनीच्या नोकरवर्गाचा व पैशाचा उपयोग करतात परंतु त्यांच्या विरोधकांना ही सोय उपलब्ध नसते. सहाजीकच, अधिकारारूढ पक्षाचें स्थान बळकट होतें.

बॉंबे स्टॉक एक्सचेंजनें ह्यासंबंधांत खालीलप्रमाणें सूचना केल्या आहेत:—

( १ ) प्रॉक्झी मिळविण्यासाठी कंपनीच्या नोकरवर्गाचा व पैशाचा उपयोग करण्यांत येऊं नये.

( २ ) भागीदारानें ठरावास अनुकूल वा प्रतिकूल मत द्यावें, अशी व्यवस्था करणारी प्रॉक्झीवरील शब्दयोजना असावी.

( ३ ) भागीदाराचा प्रॉक्झी म्हणून सभेस उपस्थित असणारा हा कंपनीचा भागीदारच असण्याचें प्रयोजन नाहीं. त्याला सभेंत बोलण्याचा, मत देण्याचा व पोल मागण्याचा अधिकार असावा.

( ४ ) भागीदाराला आपलीं कांहीं मतें ठरावाच्या बाजूनें देण्याचा, तर कांहीं मतें ठरावाच्या विरुद्ध देण्याचा आणि कांहीं मतांचे बाबतींत तटस्थ रहाण्याचा अधिकार असावा. त्याच्या प्रॉक्झीसहि असे अधिकार त्याला देतां यावे.

( ५ ) कंपनीकडे नोंदलेल्या प्रॉक्झी सभेच्या वेळेपूर्वीं २४ तास तरी पहावयास मागण्याचा अधिकार भागीदारांस असावा.

# स्थानिक स्वराज्याचा कारभार

## सुधारणेचे मार्ग

(पुणें रोटरी क्लबांत श्री. एस. जी. बर्वे, आय. सी. एस., पुणें म्युनिसिपल कमिशनर, ह्यांनीं दिलेल्या व्याख्यानाचा सारांश)

हिंदुस्थानांत स्थानिक स्वराज्य संस्थाचे अनेकविध प्रकार आहेत. अशा संस्थाची संख्याही मोठी असून त्यांत छोट्या ग्रामपंचायतींपासून ते मोठ्या म्युनिसिपालिटिचा आणि कॉर्पोरेशन ह्यांचा अंतर्भाव होतो. ह्या श्रेणीच्या अगदी तळाशीं लहान पंचायती आहेत. ह्या पंचायती प्रत्येकीं फारतर १०० घरांच्या नागरी गरजांकडे लक्ष पुरवतात. दुसऱ्या टोकाला मुंबई म्युनिसिपालिटी-सारख्या प्रचंड कॉर्पोरेशन्स आहेत. मुंबई कॉर्पोरेशनचें वार्षिक उत्पन्न सहा कोटी रुपयांच्या वर असून एखाद्या लहानशा प्रांतिक सरकारच्या उत्पन्नाशीं तुलना करतां येण्याइतकें तें मोठें आहे. ह्या दोन टोकांमध्यें पुन्हा अनेक प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था येतात. देशाच्या वेगवेगळ्या भागांत त्यांना निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. अशा संस्थांपैकीं कांहीं संस्था शहरांची व्यवस्था पहातात आणि जिल्हा लोकलबोर्डासारख्या कांहीं संस्था ग्रामीण भागांची व्यवस्था पहातात. १५ ऑगस्ट १९४७ नंतर प्रांतांमधून जीं राष्ट्रीय सरकारें अस्तित्वांत आलीं, त्यांनीं ग्रामपंचायतींच्या कक्षेंत हल्लींपेक्षांहि अधिकाधिक खेडीं आणण्याचा निश्चय जाहिर केला आहे. उदाहरणार्थ मुंबई प्रांतच घ्या. नुकताच मंजूर झालेला ग्रामपंचायतीचा कायदा पूर्णपणें अमलांत आणला जाईल त्यावेळीं मुंबई प्रांतभर कित्येक हजार ग्रामपंचायती आपला कारभार सुरू करतील. स्थानिक स्वराज्याच्या क्षेत्रांत नवीन प्रयोगही करण्यांत येत आहेत. मध्यप्रांतांतील जनपदसभांचा उपक्रम ह्याच स्वरूपाचा आहे. तेव्हां, एकंदरीनें विचार करतां, स्थानिक स्वराज्याचा प्रश्न हा राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें कांहीं कमी महत्त्वाचा नाहीं.

### स्थानिक संस्थांच्या कक्षेंतील कार्यें

ह्या स्थानिक संस्थांच्या कक्षेंत जीं कार्यें येतात, त्यांना सामाजिक दृष्टीनें मोठें आणि वाढतें महत्त्व आहे. उदाहरणार्थ, प्राथमिक शिक्षण हा विषय. त्यावर कांहीं प्रमाणांत नियंत्रण आणि देखरेख असली तरी बऱ्याच प्रमाणांत, जवळ जवळ पूर्णपणें, तो स्थानिक संस्थांच्या क्षेत्रांत मोडतो. स्वायत्त हिंदुस्थानच्या नजीकच्या ध्येयां-पैकीं एक ध्येय प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें करणें हें असल्यानें, ह्या विषयाला पुढील कांहीं वर्षांत फारच महत्त्व येणार हें निश्चित आहे. सार्वजानिक आरोग्य हा दुसरा एक विषय पहा. हाहि विषय मुख्यतः नागरी आणि ग्रामीण स्थानिक संस्थांच्या कक्षेंतच येतो. रोगप्रतिबंधक उपाययोजना आणि रोग झाल्यास वैद्यकीय इलाजांची व्यवस्था ह्या सार्वजनिक आरोग्यविषयक दोन्ही प्रकारच्या उपायांचा प्रसार सर्व देशभर फार मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे. भोर कमिटीनें ह्यासंबंधीं केलेल्या शिफारसी आवाच्यासवा आहेत, असें म्हणतां यावयाचें नाहीं. ह्या कमिटीच्या शिफारसी अंमलात आणावयाच्या झाल्या (आणि त्या योग्य कालांत अंमलांत आणावयासच हव्यात) तर ह्या कामांत सर्व ठिकाणच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना फार महत्त्वाचें कार्य करावें लागेल. दळणवळण हा आणखी एक महत्त्वाचा विषय असा आहे कीं, त्या क्षेत्रांत स्थानिक स्वराज्य संस्थांकडे जबाबदारीचा बराच मोठा वाटा येतो. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी आपल्या देशांत ज्या पद्धतीचें सरकार होतें, त्याला राज्य-शास्त्रांत सामान्यतः 'पोलिसांचें राज्य' असें म्हणतात. ह्याचा अर्थ असा कीं, सरकारचें लक्ष मुख्यतः राज्य करण्याच्या प्राथमिक कामांतच गुंतलेलें असें. ह्या कामांत पुढील बाबींचा समावेश होतो. देशांत अंतर्गत शाश्वति निर्माण करून, कायदा आणि सुव्यवस्था राखणें, दिवाणी आणि फौजदारी न्यायदानाची व्यवस्था करणें व सारा गोळा करणें आणि जमिनीचा धारा ठरविणें. अशा परिस्थितींत स्थानिक स्वराज्य संस्थांना फारसें महत्त्वाचें स्थान नव्हतें तें साहाजिकच आहे. कारण, ह्या संस्थांचीं कार्यें मुख्यतः सामाजिक उपयुक्ततेच्या स्वरूपाचीं आहेत. स्वराज्य-प्राप्तीनंतर पूर्वी ह्या गोष्टींना महत्त्व नव्हतें त्यांस आतां तें येणें अपरि-हार्यच आहे. ह्यापुढें राष्ट्रीय आणि प्रांतिक कारभारापैकीं, ज्या कामांना सामाजिक हिताचीं कार्यें म्हणता येईल, अशांना अधिक महत्त्वाचें स्थान प्राप्त होणार आहे. अर्थात् राज्यसंस्थेंत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराच्या क्षेत्रास आजपर्यंत जितकें महत्त्व होतें, त्यापेक्षां पुष्कळच अधिक महत्त्व ह्यापुढें प्राप्त होणें स्वाभाविकच आहे.

### असमाधानकारक कारभार व त्याचीं कारणें

स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रचंड संख्या आणि त्याच्या कार्याचें सामाजिक जीवनांत असणारें मोठें व वाढतें महत्त्व, ह्या दोन्ही दृष्टींनीं त्यांचा कारभार समाधानकारक रीतीनें चालणें अगत्याचें आहे. अर्थात् त्याबाबत काळजीपूर्वक विचार करणें योग्यच ठरेल. सामान्यपणें बोलतांना, स्थानिक संस्थांच्या कारभाराबाबत सार्वत्रिक असंतोष आहे असें विधान मी केलें तर त्याला विशेष विरोध होण्याचें कारण दिसत नाहीं. सर्व प्रांतांतील स्थानिक संस्थांची रूपरेषा साधारणतः सारखीच आहे. तथापि, त्यांच्या कारभारावर जें नियंत्रण आहे आणि जी देखरेख ठेवली जाते, त्यांत मात्र प्रांतागणिक फरक आहे. कांहीं विशिष्ट प्रांतांतून स्थानिक संस्थांच्या कारभाराचा दर्जा इतर प्रांतांच्या मानानें जो पुढारलेला दिसतो, त्याचें कारण हेंच असूं शकेल. असें असलें तरी, स्थानिक संस्थांचा कारभार जसा असावा अशी अपेक्षा असते, त्यापेक्षां ते फारच कमी प्रतीचा आहे, असें जाणत्या लोकांचें सर्वसाधारण मत झालें आहे ह्यांत शंका नाहीं. स्वराज्य आल्यानंतर अशा कनिष्ठ प्रतीच्या घटकांची जरूरीच राहिली नसल्यानें, ते पूर्णपणें रद्दच करण्यास कांहीं हरकत नाहीं असें म्हणण्यापर्यंत कांहीं लोकांच्या युक्तिवादाची मजल गेली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारांत कार्यक्षमतेचा अभाव उत्पन्न होण्यास जीं कारणें झालीं, त्यांचें पृथक्करण करतां तीं तीन महत्त्वाच्या गटांत पडतात असें मला वाटतें:—

(१) स्थानिक संस्थांना आपला कारभार अत्यंत तुटपुंज्या पैशावर चालवावा लागतो.

(२) स्थानिक संस्थांच्या खऱ्या अडचणींत त्यांना मदत करणें, त्यांना मार्गदर्शन करणें, त्यांना तांत्रिक साह्य करणें आणि त्यांच्या कामावर सतत नियंत्रण ठेवणें व देखरेख करणें आवश्यक असतें. परंतु हें कार्य करणाऱ्या योग्य अशा सरकारी व्यवस्थेचा अभाव आहे.

(३) धोरण आंखण्याचें कार्य आणि अंमलबजावणीचें कार्य ह्यांच्यांत फरक केला गेला नाहीं. लोकनियुक्त मंडळांकडेच अंमल-बजावणीचें कार्य सोपविण्यांत आलें. त्यामुळें म्युनिसिपल अधि-कारी वर्ग पूर्णपणें निष्क्रिय झाला, अंमलबजावणीचे कामीं त्याला मोकळीक उरली नाहीं आणि त्यामुळें कारभार निस्तेज होऊन कार्यक्षमता रसातळास गेली.

### आर्थिक टंचाई

ह्या तीन्ही गटांतील कारणांचा अधिक सूक्ष्मपणें अभ्यास करणें

हिताचें ठरेल. जगांतील कोठलीहि स्थानिक स्वराज्य संस्था, तिच्या मनांत असलेली सामाजिक सेवा करण्याइतका पैसा तिच्या जवळ आहे असें बहुधा मानीत नाहीं हें तर खरेंच; पण त्याचबरोबर आपल्या देशांतील स्थानिक संस्थांना आजवर सतत अत्यंत निरुत्साहजनक अशा आर्थिक परिस्थितीशीं सामना द्यावा लागला आहे हेंही सत्यच आहे. मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांनीं महत्त्वाच्या, वाढत्या आणि लवचिक अशा उत्पन्नाच्या सर्व बाबी आपल्याकरतां राखून ठेवलेल्या आहेत. शिवाय, पुष्कळशा बाबतींत प्रांतिक सरकारांनीं स्थानिक संस्थांच्या कराच्या क्षेत्रावर आक्रमण केलेलें आहे आणि वास्तविक जे कर फक्त स्थानिक संस्थांनाच मिळाले पाहिजेत ते स्वतः-कडे घेतले आहेत. उदाहरणार्थ, मुंबई प्रांतांतील मुंबई, अहमदाबाद आणि पुणें ह्या शहरांत बसविलेला 'अर्बन इम्मुव्हेबल प्रॉपर्टी टॅक्स' हा कर प्रांतिक सरकार घेत असल्यानें तो तेथील म्युनिसिपालिट्यांना मारक ठरत आहे. करमणुकीवरील कराचें दुसरें उदाहरण असेंच आहे. मुंबई प्रांताचें सरकार हा सर्व कर आपणच घेतें. इतर कांहीं प्रांतांतून मात्र अशी परिस्थिति नाहीं. गेल्या दहा वर्षांत रहाणीच्या खर्चांत फारच वाढ झालेली दिसून येते. त्यामुळें नोकरांच्या पगाराच्या श्रेणींचा फेरविचार करणें आणि त्यांना महागाईभत्ता देणें आवश्यक झालें आहे. स्थानिक संस्थांच्या तिजोरीवर ह्या कारणांमुळें फार ताण पडलेला आहे. शहरी स्थानिक संस्थांच्या उत्पन्नाचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे घरपट्टी होय. बहुतेक प्रांतांतून घरभाड्यांत वाढ होऊं नये म्हणून भाडें नियंत्रण कायदे करण्यांत आलेले आहेत. त्यामुळें उत्पन्नाच्या ह्या बाबींत कांहीं वाढ होणें फारसें शक्य राहिलेलें नाहीं. कांहीं उदाहरणें अशीं आहेत कीं, त्यांत स्थानिक संस्थांनीं स्वतःच आपल्या उत्पन्नाच्या बाबींचा पूर्णपणें उपयोग करण्याचा प्रयत्नच केलेला नाहीं, ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. कित्येक स्थानिक संस्थांची आर्थिक टंचाई कांहीं प्रमाणांत ह्या कारणामुळें उत्पन्न झाली असणें शक्य आहे. तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थांनीं आपल्या अखत्यारांतील उत्पन्नाच्या बाबींवर जास्तींत जास्त कर बसवून सुद्धा स्वतःच्या कार्यक्षेत्रांत योग्य ती कार्यक्षमता दाखविण्याचा आणि समाधानकारक सेवा करण्याचा खर्च त्यांना झेपत नाहीं, हेंहि खरें आहे. ह्या विषयासंबंधीं जनतेच्या भावना लक्षांत घेऊन, हिंदुस्थान सरकारनें नुकतीच एक कमिटी नेमली असून तिजकडे स्थानिक संस्थांच्या उत्पन्नाच्या बाबींचा आढावा घेण्याचें काम सोपविलेलें आहे. स्थानिक संस्था, प्रांतिक सरकारें आणि मध्यवर्ती सरकार ह्यांच्या उत्पन्नाच्या बाबींसंबंधीं जी नवीन व्यवस्था होत आहे तींत स्थानिक संस्थांच्या मोठ्या आणि वाढत्या गरजांकडे योग्य तें लक्ष पुरविलें जाईल, अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

### योग्य मार्गदर्शन व नियंत्रण ह्यांचा अभाव

मुंबई सरकारनें नेमलेल्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह एन्क्वायरी कमिटीनें गेल्या वर्षी आपला अहवाल सादर केला. त्या अहवालांत कमिटीनें मार्मिकपणें असें दाखवून दिलें आहे कीं, प्रांतिक सरकारांनीं स्थानिक संस्थांच्या कारभारावर ज्या स्वरूपाचें नियंत्रण ठेवलें, त्याचा प्रकार 'घण हाणण्या'सारखा होता. त्याऐवजीं तो 'आवरण्यासाठीं लगाम आणि उत्तेजनासाठीं टोचणी' ह्या स्वरूपाचा हवा होता. म्हणजे असें कीं, प्रांतिक सरकार स्थानिक संस्थांना आपल्या कारभारांत निर्वेधपणें व न हटकतां शैथिल्य व गोंधळ उडविण्याची मुभा देतें आणि मग घणासारखा अचानक आघात करून तें त्या रद्द करतें. सरकार आणि स्थानिक संस्था ह्यांच्यांत ज्या प्रकारचें नातें असावयास पाहिजे, त्या प्रकारचें हें नातें आहे असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. स्थानिक स्वराज्य संस्थांना अचुक दिशा दाखविण्यासाठी, योग्य त्या बाबींत पुढाकार घेण्यास त्यांना उत्तेजन देण्यासाठीं, ज्या ज्या वेळीं त्यांना तांत्रिक स्वरूपाचा सल्ला स्वतः मिळविणें अशक्य होत असेल त्या त्या वेळीं त्यांना तो पुरविण्यासाठी आणि त्यांच्या खऱ्याखुऱ्या अडचणी सोडविण्यासाठीं, सरकारनें सतत आणि एकसारखा सल्ला देण्याचीं साधनें निर्माण केलीं पाहिजेत. ह्या तत्त्वास अनुसरून मुंबई सरकारच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह एनकायरी कमिटीनें एक लोकल सेल्फ गव्हर्नमेंट बोर्ड नांवाची स्वतंत्र संघटना स्थापन करण्याची सूचना केली. ह्या बोर्डाच्या हुकमतीखालीं काम करणारा एक कमिशनर असावा आणि त्यानें सर्व स्थानिक संस्थांवर देखरेख ठेवून नियंत्रण करावें व त्यांना योग्य ती मदत द्यावी असाहि कमिटीचा सल्ला आहे. सध्या स्थानिक संस्थांवर जी कांहीं देखरेख ठेवण्यांत येते ती जिल्हा अधिकारी कलेक्टर आणि कमिशनर ह्यांच्यावर सोपविण्यांत आली आहे. पण हे अधिकारी स्वतःच्या तांतडीच्या कामांत इतके गुरफटलेले असतात, कीं स्थानिक संस्थांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास जरूर असणारा वेळ अगर शक्ती, त्यांच्याजवळ क्वचितच उरते. तेव्हां, माझ्या मतानें, कमिटीनें सुचविल्याप्रमाणें एक स्वतंत्र आणि फक्त तेंच काम करणारी संघटना उभारणें हा उपाय योग्य ठरेल.

### धोरण आंखणें व अंमलबजावणी हीं अलग पाहिजेत

स्थानिक संस्थांतून कार्यक्षमतेचा अभाव उत्पन्न करणाऱ्या कारणांपैकीं शेवटच्या गटांतील कारणें सर्वांत अधिक महत्वाचीं आहेत. स्थानिक संस्थांच्या घटनांचे जे कायदे आहेत, त्यांतून अंमलबजावणी करण्याचें काम आणि धोरण आखण्याचें काम ह्या दोन कामांत स्पष्ट असा फरक करण्यांत आलेला नाहीं. ह्याला लक्षांत भरण्यासारखा अपवाद फक्त मुंबई कॉर्पोरेशनचा आहे. आपल्या देशांतील स्थानिक स्वराज्याचा ज्यांनीं सूक्ष्म अभ्यास केला आहे, त्यांचें असें मत आहे कीं, मुंबई कॉर्पोरेशन भरीवपणें यशस्वी होण्याचीं जीं कारणें आहेत, त्यांत अंमलबजावणी आणि धोरण ह्या दोन कामांत तीमध्यें करण्यांत आलेला स्पष्ट भेद हें कारण प्रमुख आहे. मुंबई कॉर्पोरेशनमध्यें म्युनिसिपल कमिशनर हा म्युनिसिपल अंमलबजावणीच्या कामाचा वादातीत प्रमुख असतो. कॉर्पोरेशनच्या अंमलबजावणीच्या सर्व कामावर नियंत्रण ठेवणें आणि देखरेख करणें हें निःसंदिग्धपणें, सर्वस्वी त्याच्यावर सोपविलेलें असतें. मुंबई सिटी म्युनिसिपल ॲक्टान्वयें त्या कार्पोरेशन-मध्यें कमी-अधिक प्रमाणांत समन्वयानें काम करणारे दोन स्वतंत्र भाग आहेत. अंमलबजावणीच्या खात्याचें काम म्युनिसिपल कमिशनर पाहतो. आर्थिक आणि करविषयक धोरण निश्चित करण्याचें व त्यावर नियंत्रण ठेवण्याचें काम कॉर्पोरेशन आणि स्टँडिंग कमिटी करते. माझ्या मतें, मुंबई म्युनिसिपल कायद्यांत आढळणारें अंमलबजावणी आणि धोरण ठरविणें हीं दोन कामें अलग करण्याचें तत्त्व, स्थानिक स्वराज्याच्या सर्व क्षेत्रांत लावण्यांत आलें पाहिजे. सध्या देशांत एक प्रकारची नवीन जाणीव उत्पन्न झालेली आहे. स्थानिक संस्थांकडून नागरिक ज्या प्रकारच्या कार्यक्षम कारभाराची आणि सेवेची अपेक्षा करतात, ती पूर्ण व्हावयाची असेल तर वरील फरक केला जाणें आवश्यक आहे. नाहींतर, ही अपेक्षा पुरी होणार नाहीं. त्यासाठीं म्युनिसिपल अधिकाऱ्यांना पुरेसें स्वातंत्र्य देण्यांत आलें पाहिजे आणि वरिष्ठ अधिकाराच्या जागा भरण्याची जी सत्ता प्रातिनिधिक चर्चा मंडळाला दिली आहे त्यावर, योग्य त्या प्रकारचीं बंधनें घालण्यांत आलीं पाहिजेत. म्युनिसिपालिटीनें करावयाच्या प्रत्यक्ष कामांत म्युनिसिपल अधिकारीवर्गाला पुरेशी मोकळीक आणि वाव तर

असावा आणि तरी सुद्धा लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधींनीं धोरणाची जी दिशा घालून दिली असेल त्या दिशेनें काम करण्याचें असंदिग्ध बंधन त्या अधिकारी वर्गावर असावें, असा हा समन्वय साधावयाचा आहे. अशा प्रकारची कार्यपद्धति प्रत्यक्ष घालून देणें हें काम मात्र फारसें सोपें नाहीं. नागरिकांनींच ज्या तऱ्हेचे प्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थांवर निवडून दिले असतील, त्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून रहातात हें तर खरेंच; तरीपण, म्युनिसिपल अधिकारी वर्ग, स्थानिक संस्थांचीं प्रतिनिधी मंडळें आणि त्यांचीं उपमंडळें ह्यांच्यांत समाधानकारक संबंध प्रस्थापित केल्यानेंच स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार समाधानकारकपणें चालण्यासाठीं जरूर असणारें वातावरण उत्पन्न होणार आहे.

ह्या तीन कारणसमुच्चयाचा जर योग्य तो विचार करण्यांत येऊन सध्याच्या पद्धतींतील उणीवा दूर करण्यांत आल्या तर स्थानिक स्वराज्य संस्था पूर्णपणें योग्य विकास पावणार नाहींत, अगर जनतेच्या उच्च अपेक्षेप्रमाणें कर्तव्यें पार पाडणार नाहींत, अशी लोकांनीं निराशा बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं.

## ठेवींत घट व कर्जांत वाढ

( इंपीरिअल बँकेसंबंधीं खालील आकडे इतर बँकांच्या अनुभवास धरूनच आहेत. )

इंपीरिअल बँकेजवळ ३० जून १९४९ अखेर २६२ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. एका वर्षापूर्वी ठेवींची रक्कम २८९ कोटी रुपये होती. म्हणजे, बँकेजवळील ठेवींत २७ कोटींची (९ %) घट झाली. ह्याच मुदतींत, सर्व शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींत मिळून ११% घट झालेली आहे.

इंपीरिअल बँकेनें दिलेल्या कर्जांची रक्कम ३० जून १९४८ रोजीं ९७ कोटी रुपये होती, ती एका वर्षात २१ कोटींनीं वाढून ११८ कोटी रुपये झाली आहे. ठेवींत घट व कर्जांत वाढ ह्यांमुळें बँकेची कर्जरोख्यांतील गुंतवणूक १४७ कोटींवरून १०० कोटींवर उतरली आहे. १४% डिव्हिडन्ड कायम आहे.

बँकेच्या नोकरींत अधिकारी वर्गाच्या जागीं अद्याप ५९ युरोपियन आहेत. अर्थात्, गेल्या वर्षाचे मानानें त्यांची संख्या १४ नें कमी झाली आहे.

### बजेटांतील उत्पन्नाच्या अपेक्षा पुऱ्या होणार काय ?

हिंदुस्थान सरकारास एप्रिल व मे १९४९ ह्या दोन महिन्यांत कस्टम्स व एक्साइज पट्ट्यांचे ३६ कोटी, २२ लक्ष रुपये मिळाले. परंतु १९४९–५० च्या उरलेल्या दहा महिन्यांत ह्या दरानें उत्पन्न मिळत रहाण्याचा संभव नाहीं, आणि मध्यवर्ती अंदाजपत्रकांतील अंदाज चुकीचा ठरणार असें दिसूं लागलें आहे. आयातीवरील निर्बंध वाढविल्याकारणानें, मायातीवरील जकातीचें उत्पन्न स्वाभाविकच घटणार आहे. चहाखेरीज बाकीच्या बाबतींत निर्गतीचा अनुभव विशेष उत्तेजनकारक नाहीं. पाकिस्तानकडे पाठविण्यांत येणाऱ्या मालांवर एक्साइज पट्टी माफ करण्याची कल्पना बजेटाचे वेळीं नव्हती. उद्योगधंद्यांची चलतीहि कमी झाली असल्यानें प्राप्तिवरील कर मध्यवर्ती उत्पन्नांत अपेक्षेप्रमाणें भर घालील किंवा नाहीं ह्याची शंका आहे. सरकारचा वाढता खर्च लक्षांत घेता, उत्पन्नाच्या बाबींतील अपेक्षित घट उत्तेजनकारक नाहीं.

## मुंबई हायकोर्टाचा 'स्टॅम्प ॲक्ट' खालील महत्त्वाचा निर्णय

### व्यवहार ठरविणारा कागद व व्यवहाराची नोंद ह्यांचेमधील फरक

चुनीलाल गिरधारीलाल व त्यांची बायको ह्यांचे पासून एका गृहस्थानें कांहीं शेअर्स १ लक्ष, २५ हजार रुपयास खरेदी केले. परंतु रक्कम चुकती करण्यास खरेदीदाराजवळ पैसे नव्हते म्हणून त्यानें तेच शेअर्स त्याच रकमेला चुनीलाल ह्यांचेकडे गहाण ठेवले. त्यासाठी शेअर सर्टिफिकेट्स् व कोरा ( ब्लॅन्क ) ' शेअर्स वर्ग करण्याचा फॉर्म ' चुनीलालकडे ठेवावयाचा असें ठरविण्यांत आलें व ह्या व्यवहाराबद्दल एक लेख करून ठेवण्यांत आला. पुढें असा प्रश्न उपस्थित झाला कीं सदरील लेखानेंच हा व्यवहार ठरविण्यांत आलेला आहे कां तो लेख हा केवळ तत्पूर्वी ठरलेल्या व्यवहाराची नोंद म्हणून लिहिलेला आहे ? त्या लेखानेंच व्यवहार ठरविण्यांत आला असें सिद्ध झालें तर तो गहाणखत समजावयाचा कां करारपत्र समजावयाचा ? असा पुढील प्रश्न उपस्थित होत होता. तो लेख गहाणखत ठरला तर त्यावर जब्बर स्टॅम्प भरावा लागला असता; करारपत्र ठरला असता तर फक्त दीड रुपयाचा स्टॅम्प लावावा लागला असता; आणि पूर्वीच्या व्यवहाराची नोंद करणारा ठरला असता तर त्यावर कांहींच स्टॅंप लावण्याची आवश्यकता नव्हती. सबब हा प्रश्न मुंबई हायकोर्टापुढें मतप्रदर्शनार्थ मांडण्यांत आला. सर न्यायधीश छगला व न्यायमूर्ति गजेंद्रगडकर व शहा ह्यांच्या न्यायमंडळानें नुकताच त्याचा निर्णय दिला आहे. स्टॅम्पचा आकार निश्चित करण्याचे संबंधांत दस्तऐवज ज्या प्रकारचा आहे असें रेव्हेन्यू अधिकाऱ्यांपुढें सांगण्यांत आलेलें असेल तद्व्यतिरिक्त तो अन्य प्रकारचा आहे असें कोर्टास दाखविण्यास कांहींहि प्रतिबंध नाहीं. पूर्वीचेंच सांगणें कायम ठेवलें पाहिजे असें बंधन नाहीं. मूळ दस्तऐवज कायम रहात असल्यामुळें तो स्टॅम्प ॲक्टच्या कोणत्या सदरांत पडतो तें दाखविण्याचे कामीं नवा दृष्टिकोन केव्हांहि स्वीकारता येईल. अशाप्रकारें पूर्वीपेक्षां नवा युक्तिवाद पुढें आल्यास व त्याचे संबंधी रेव्हेन्यू अधिकाऱ्यांचें म्हणणें काय आहे तें उपलब्ध कागदपत्रावरून कोर्टास कळून येण्याची सोय नसल्यास कोर्टाला जरूर तर सर्व प्रकरण पुनः रेव्हेन्यू अधिकाऱ्यांकडे पाठवून त्यांचें मत मागवितां येईल. म्हणून नवा दृष्टिकोन दाखविण्यास केव्हांहि हरकत नाहीं असा मोठा महत्त्वाचा निर्णय न्यायमंडळानें सुरवातीलाच दिलेला असून प्रस्तुत प्रकरणांतील लेखाचा विचार करून असा निर्णय दिला आहे कीं, सदरील लेख तत्पूर्वी पूर्णत्वानें ठरविण्यांत आलेल्या व्यवहाराचा उल्लेख करीत असून त्यांतील भाषा लेख लिहिण्यापूर्वी व्यवहार निश्चित करण्यांत आला असेंच दर्शविणारी आहे. सबब तो लेख तत्पूर्वी ठरविलेल्या व्यवहाराची केवळ नोंद करणारा आहे व म्हणून त्यावर अजीबात कांहींच स्टॅम्प लावण्याची आवश्यकता नाहीं.

—स. वा. दातार

**शेतकी शाळेचें उद्घाटन**—मुंबई सरकारचे फडणीस श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं बेळगांव जिल्ह्यांत अर्भवी येथें एका शेतकी-शाळेचें नुकतेंच उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. मेहता म्हणाले कीं, मुंबई प्रांतांतील शेतकी शाळांनीं आपल्या शिक्षणाचा दर्जा चांगला राखला आहे. आतांच नवी उघडलेली शाळाहि चांगलें काम करील अशी आशा त्यांनीं व्यक्त केली.

## वेस्टर्न इंडियाच्या पुणें शाखेच्या एजंटांची वार्षिक सभा

तारीख १५ ऑगस्ट १९४९ रोजीं, स्वातंत्र्य दिनाचे दिवशीं; कंपनीचे पुणें येथील लक्ष्मी रोड वरील इमारतींत एजंटांची वार्षिक सभा दुपारीं ३॥ वाजतां झाली. कंपनीचे मॅनेजर श्री. बाळासाहेब जोशी, बी. ए., एफ्. आय. ए. अध्यक्षस्थानीं होते. प्रारंभीं पुणें शाखाधिकारी श्री. कृ. ग. खांडेकर, एम्. ए. यांचें प्रास्ताविक भाषण झालें. त्यानंतर श्री. कृ. अ. फडणीस व बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजचे प्राध्यापक श्री. ढेकणे यांचीं भाषणें झालीं. सभेचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब जोशी, बी. ए., एफ्. आय. ए., यांनीं एजंटस् मंडळींचीं कर्तव्यें वगैरेबाबत विवेचन केल्यावर आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रम संपला.

१९४८ सालीं काम मिळविण्यांत सौ. मालिनीबाई जोशी एजंट यांचा पहिला नंबर आला, त्यांना व श्री. वाय. जी. जोशी, सौ. विमलाबाई एम्. गोळे, सौ. नलिनीबाई कृ. फडणीस व सौ. सुशीलाबाई एस्. देशपांडे यांनांही अध्यक्षांनीं बक्षिसें जाहीर केलीं.

पुणें शाखाधिकारी, श्री. कृ. ग. खांडेकर, एम्. ए., ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत वेस्टर्न इंडियाचें वाढतें काम, मूल्यमापनांत आढळणारी तिजी मजबुती, पहिल्या प्रतीचे बोनसचे दर, काटकसरीचा कारभार, निधीची सुरक्षित गुंतवण, कंपनीनें चालू केलेली ट्रस्टी कंपनी व मुद्रण संस्था, इत्यादींचा उल्लेख केला. विमेदारांस मिळणाऱ्या वागणुकीसंबंधीं ते म्हणाले:—

### विमेदारांच्या हिताची जपणूक

"विमेदारांस मिळणारी वागणूक, त्यांच्या कांहीं तक्रारी असल्या तर त्या दूर होणेबद्दची तत्परता, आवश्यक ती माहिती पुरविणेची आस्था, वगैरे संबंधीं आपल्या अनुभवास आलेच असेल कीं, आपल्या शाखा कचेरींत अगर इतर ऑफिसमधून याबद्दल कंपनीचा नोकरवर्ग, अधिकारी वर्ग व संचालक मंडळी अत्यंत आस्थेवाईकपणें सर्व बाबतींत लक्ष घालतात. विमेदार, एजंट मंडळी व कंपनीचे ऑफिसांतील मंडळी जणूं काय एकाच कुटुंबाचे घटक आहेत अशा भावनेनें सर्वांची वागणूक असते. अलीकडे अलीकडे तर क्लेम्सचे बाबतींतही, कंपनीनें मुद्दाम क्लेमंटकडे जाऊन त्यास कांहीं फॉर्म भरणेची वगैरे बाबत अडचणी असल्यास त्यास मदत करून शक्य तो लवकर क्लेमची रक्कम त्याचे कुटुंबियास पोहोंचती व्हावी याबद्दलही उपक्रम आरंभला आहे. याबाबतींत प्रारंभापासूनच कोर्टातील वारसाचें सर्टिफिकेट पाहिजे असा आग्रह न ठेवतां जामीनकी वगैरे घेऊन सहानुभूतिनें पहाण्याचें कंपनीनें धोरण ठेविलें आहे. विमेदारांचे पश्चात् अगदीं अल्पही त्रास होऊं नये यासाठीं सुरवातीसच पॉलिसिचें बेचन-पत्र होणें व विमेदारांचें वय मान्य करून घेणें याबद्दल आपण कटाक्ष ठेवावा. आतां विमा कायद्याप्रमाणें पॉलिसीचेंमध्येंच नॉमिनेशनचें नांव घालणेंची सोय झाली आहे, त्यामुळें कार्यभाग हलका झाला आहे. तरी याही बाबतींत आपण सर्व दक्षता घेतल्यास विमेदार मंडळींचें हित केल्यासारखें होऊन त्याचा आपणांस नवीन कामाचे दृष्टीनें उपयोग झाल्याशिवाय रहाणार नाहीं."

---

### दि टीचर्स प्रॉव्हिडंट इं. सोसायटी लि., नागपूर

वरील सोसायटीनें १९४८ सालीं १,२९,९०० रुपयांचीं विमापत्रकें दिलीं. १९४७ सालीं १,०१,६०० रुपयांचीं विमापत्रकें दिलेलीं होतीं. प्रत्येक पॉलिसीची रक्कम सरासरी ४८६ रु. चो. ५२२ रु. झाली आहे. सोसायटीनें आरंभापासून उद्भवलेल्या हक्कापोटीं २९२ कुटुंबीयांना एकूण १,०४,६७८ रु. दिले आहेत. अहवालाचे वर्षीं विमानिधींत ७,८४९ रुपयांची भर पडली. सोसायटीचें १९४८ अखेरचें पंच वार्षिक मूल्यमापन श्री. डी. एस. सुब्रह्मण्यम, एम. ए., ए. आय. ए., एफ. एस. एस. (लंडन) ह्यांनीं केलें आहे, तें २½% दरानें केलेलें आहे. नफ्यासहित विमापत्राकरितां २५% आणि नफ्याविरहित विमापत्राकरितां २०% खर्चाचें प्रमाण राखून ठेवण्यांत आलें आहे. पॉलिसी लायाबिलिटी ४०,३१८ रु. दिसून आली आणि लाइफ फंडांत ४३,५५८ रु. होते. तेव्हां रिझर्व्ह फंडांतील ५,८१३ रु. तसेच बाजूस राखूनहि सोसायटीचे मूल्यमापनांत ३,२४० रु. वाढावा राहिला. त्यांतून नफ्यासहित सर्व विमापत्रांना (हयातींतील व हयातीनंतरच्या, दोन्ही) दर हजारी दरसाल १० रु. बोनस द्यावा व पुढील मूल्यमापनाचे अवधींत हक्कपूर्तीस पात्र होणाऱ्या विमापत्रांना दरसाल दर हजारीं १० रु. इंटेरिम बोनस द्यावा, अशी ॲक्चुअरीची शिफारस आहे. "सोसायटीचा व्यवस्था खर्च फारच कमी आहे. तो सेवा आणि सहकार्य या तत्त्वाचा निदर्शक आहे" असें म्हणून ॲक्चुअरींनीं आपला अहवाल सादर करतांना १९४४ चे मूल्यमापनाचे अहवालांतील सूचनांकडे संचालकांनीं बरेंच लक्ष दिल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. ह्या सर्व वृत्तांतावरून, सोसायटीच्या काटकसरी, सुरक्षित व ध्येयनिष्ठ कारभाराची कल्पना येते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि सोसायटीनें उत्कृष्ट यश मिळविलें आहे. दृष्टिदीपक आंकड्यांची किफायतशीर व्यवहारास आवश्यकता नसते, हें सोसायटीनें पटवून दिलें आहे. ह्याबद्दल संचालकांचें अभिनंदन करणें जरूर आहे. (प्रेसिडेन्ट: ले. क. श्रीमंत राजे प्रतापसिंगराव भोंसले, एम्. एल. ए.; जनरल सेक्रेटरी: श्री. पुं. ना. चटपल्लीवार)

---

### "अमेरिकेंतील सात महिने" प्रदर्शन

लॉर्ड रे महाराष्ट्र संग्रहालय, पुणें या संस्थेचे विद्यमानें पुणें येथें "अमेरिकेंतील सात महिने" असें प्रदर्शन, श्री. भा. वि. धारपुरे यांनीं नुकताच यूरोप-अमेरिकेंत प्रवास केला, त्यांत जे अनुभव व जें साहित्य मिळविलें, ज्या देणग्या संपादन केल्या व जो संग्रहालय-संवर्धनाचा विद्याभ्यास केला, त्या साधनसंपत्तीच्या सहाय्यानें, भरविण्यांत येणार आहे. मुंबई सरकारच्या पुणें येथील पावसाळी अधिवेशनाच्या सुमारास येत्या सप्टेंबर महिन्यांत हें प्रदर्शन होणार आहे. या प्रदर्शनाचा उघडण्याचा समारंभ अमेरिकेचे कॉउन्सल जनरल मि. टिंबरलेक यांच्या हस्तें होणार आहे. याच वेळीं संस्थेचे नोकरांस नियतकालिक नियोजनानुसार परदेशीं विद्यार्जनासाठीं पाठविण्याकरितां परदेशपर्यटन-निधि प्रचलित करण्यांत येणार आहे.

---

**शाळेंतील पाठ्य पुस्तकें सारखी बदलूं नका**—पश्चिम बंगालच्या सरकारनें कांहीं दिवसांपूर्वी सर्व शाळांना एक पत्रक काढून शाळांतील पाठ्य पुस्तकें एकदा ठरविण्यांत आल्यावर ५ वर्षें बदलण्यांत येऊं नयेत असें कळविलें आहे. पालकांना अशा बदलामुळें फार खर्च येत असल्यानें वरील हुकूम काढण्यांत आला. प. बंगाल सरकारनें आतां हा हुकूम विद्यापीठाच्या पाठ्य पुस्तकांबद्दलही जारी केला आहे.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.